तुमच्या पुर्वी एक बादशाह होता,व त्याच्या जवळ एक जादुगर

सोहीब बिन सनान रुमी {अल्लाह राजी व्हावे यांच्याशी} द्वारा निवेदन आहे की, प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी फरमाविले: तुमच्या पुर्वी एक बादशाह होता,व त्याच्या जवळ एक जादुगर होता, पण तो जादुगार वयस्कर झाला व त्याने बादशहा ला
सांगितले की आता मी थकलो, तुम्ही माझ्या सोबत एक युवक पाठवा,ज्याला मी विद्या शिकवतो, त्या बादशहा ने जादुगार कडे एक मुलगा पाठवला,तो मुलगा जादुगार कडे जाण्यास निघाला असता, त्याला एक राहीब [एक ख्रिश्चन पादरी] दिसला,व त्याची शिकवण त्या मुलाला आवडली.व तो तिथेच रमु लागला.परंतु काळांतराने त्या मुलाला त्या राहीब ची बैठक खुपचं आवडायची वत्याला जादुगार पर्यंत पोहोचण्यास ऊशीर व्हायचा, जादुगार त्याला तंबी द्यायचा व मारायचा, या जादुगार ची शिकायत त्याने राहीब कडे केली असता,राहील ने त्याला सांगितले की,तु जादुगार ला घरच्या मंडळींनी उशीर केल्याचं कारण सांगायचं व घरच्यांनी विचारल्यास त्यांना जादुगर ने थांबवल्याचं कारण सांगायचं.त्यादरम्यान भररस्त्यात एका विषारी जनावराने आमरस्ता जाम केला, त्यावर त्या युवकाने एक युक्ती लढवली, त्याने म्हटले आज मी बघतोच की जादुगर सत्यावर सत्यावर आहे् की राहीब? त्याने एक दगड उचलला व म्हणाला,हे , अल्लाह ,तुला जर राहिब चा मार्ग जादुगार पेक्षा पसंद असेल तर या जनावराला नष्ट कर, लोकांना मार्ग मोकळा कर." मग त्याने एक दगड त्या जनावराला मारतच ते जनावर मरण पावले व लोकं निघुन गेली.तो मुलगा राहिब जवळ सर्व व्रुत्तांत सांगु लागला, त्यावर राहिब ने युवकाला उद्देशुन म्हटले की,तु आता माझ्यापेक्षाही पुढे निघालास.व तुझी उच्चता प्रगतीपथावर आहे, पण तुला लवकरच परिक्षेला तोंड द्यावे लागेल, परंतु परिक्षेवेळी माझे नाव घेउ न कोस.पुढे तो मुलगा जन्मतः आंधळयांना व कोड च्या रोग्यांना दुरुस्त करत होता.जवळपास सर्वच आजाराचे इलाज तो करत होता, तद्नंतर बादशहा चा एक मित्र आंधळा झाला.त्याने त्या मुलाकडे विनवणी केली की तु मला माझे डोळे परत आणुन दिल्यास, मी सोबत आणलेले सर्व उच्च भेटवस्तू तुला अर्पण करेन, त्या युवक बादशाह च्या मित्राला म्हणाला की,मी तर कुणालाच तंदुरुस्ती प्रदान करु शकत नाही.तंदुरुस्ती देणारा फक्त एकमेव अल्लाह च आहे.जर तुम्ही त्या एकमेव अल्लाह वर (ईमान)श्रद्धा बाळगशील तर मी अल्लाह जवळ तुमच्या तंदुरुस्तीसाठी दुआ याचना करतो, तुम्हाला पुर्ण तंदुरुस्ती प्रदान व्हावी, मग त्या व्यक्तीने अल्लाह वर ईमान आणले, व अल्लाह ने त्याला आजारापासून मुक्ती दिली, व तो बरा झाला. मग तो व्यक्ती बादशहा जवळ आला, जवळ येऊन बसला, त्यावर बादशहा ने विचारले की तुझे डोळे परत कुणी आणले? त्यावर तो व्यक्ती ऊत्तरला,"माझ्या पालनकर्ता ने, त्यावर बादशहा ने प्रश्न केला, की माझ्या व्यतिरिक्त अजुन कोण पालनकर्ता आहे? तो व्यक्ती म्हणाला,तुझा व माझा पालनकर्ता अल्लाह आहे, मग बादशहा त्या व्यक्तीला सजा देऊ लागला, त्यावर त्याने बादशहा ला त्या मुलाचे नाव सांगितले, मग दरबारात त्या मुलाला हजर करण्यात आले, बादशाहने त्या मुलाला विचारले की,हे ,युवका काय तुझी जादु ची पहुच ईतकी वाढली की तु आंधळयांना डोळे प्रदान करतो व जन्मतःकोडी ला बरे करतोस, मुलगा उत्तरला, मी तर कुणालाच बरं करू शकत नाही, बरं करणारा तर एकमेव अल्लाह आहे, असं म्हणताच बादशहा ने त्या मुलाला मारणे व सजा देणे सुरू केले, त्याने त्या राहिब [भिक्शु ]चं नाव सांगताच, त्याला दरबारी हजर करण्यात आले, त्याला धर्म सोडण्यास सांगण्यात आले.त्याने धर्म सोडण्यास नकार दिला, बादशाह च्या आदेशाने करवत राहीब च्या डोक्यावर ठेऊन त्याचे दोन तुकडे करण्यात आले, त्यानंतर बादशहा ने त्या मित्राला बोलावले, त्याला सांगण्यात आले की तुझा धर्म सोडुन दे! त्याने सुद्धा

नकार दिला, त्याला बेरहमी ने दोन तुकडे करून मारण्यात आले, तद्नंतर त्या मुलाला बोलावण्यात आले, त्याला पुन्हा धर्म सोडण्यास सांगण्यात आले, पण त्याने नकार दिला, मग बादशहा ने आपल्या सहकाऱ्यांना त्याला एका उंच पहाडावर घेउन जा व जर याने धर्म सोडला तर त्यखला सोडुन द्या, व जर त्याने नकार दिल्यास त्याला ऊंचीवरुन फेकुन देण्यास सांगितले, त्याला पाठीवर नेण्यात आले, त्या मुलाने अल्लाह जवळ याचना केली की,हे! अल्लाह! तु माझ्याकरता पुरेसा आहेस, तुला पाहिजे त्या मार्गाने मला वाचव! लगेच पाठीवर भुकंप आले व सर्व बादशहा ची माणसे ठार झाली, व तो मुलगा परत दरबारी हजर झाला, बादशाह ने विचारले की साथीदारांचे काय झाले? तो म्हणाला की, अल्लाह ने मला त्यांच्यापासून वाचवले, मग बादशहा ने पुन्हा काही माणसाच्या त्या मुलाला हवाली केले व सांगितले की याला दुर नाव मध्ये बसला व जर याने धर्म सोडला तर त्याला सोडून द्या, अन्यथा त्याला समुद्रात लोटुन द्यावे, एका बोटीत घेउन गेले, असता मुलाने अल्लाह कडे पुन्हा याचना केली की, हे! अल्लाह!तु मला तुझ्यापरीने वाचव! मग ती बोट अचानक पलटी झाली, व सर्व बादशहा ची माणसे डुबुन मरण पावली, तो मुलगा पुन्हा बादशहा दरबारी हजर झाला, बादशाह ने विचारले की सोबत गेलेल्यांचं काय झालं? मुलगा म्हणाला की: मला अल्लाह ने त्यांच्यापासून वाचविले, तदनंतर मुलगा बादशहा ला उद्देशून म्हणाला की: तु मला तोपर्यंत मारु शकत नाहित, जोपर्यंत हि सांगीतलेल्या पद्धतीने तुम्ही मला मारणार नाही, बादशाह म्हणाला की:ती कोणती पद्धत आहे? सर्व लोकांचे काच मैदानात जमा करावे, व मला सुलीवर लटकवा, मग माझ्या भात्यातुन एक बाण घ्या व तो कमानच्या मध्यभागी ठेवा, व म्हणा,"त्या अल्लाहच्या नावाने,जो या मुलाचा प्रभु आहे, मग मला बाण मारा, या पद्धतीने तुम्ही मला फार करु शकता, मग बादशहा ने लोकांना एका मैदानात जमा केले, मुलाला सुलीवर लटकवण्यात आले, मग त्याच्या भात्यातुन एक बाण काढला, त्याला कमाणीच्या मध्यभागी ठेवण्यात आले, व म्हणण्यात आले, त्या अल्लाहच्या नावाने जो या मुलाचा प्रभु आहे, मग तो बाण जरा त्या मुलाला मारण्यात आला, तो बाण सरळ त्या मुलाच्या कवटीत लागला, त्या मुलाने आपला हात त्या बाण लागलेल्या जागेवर ठेवला व तो मरण पावला, सर्व लोकं म्हणाले, आम्ही या मुलाच्या प्रभुवर ईमान आणले, आम्ही या मुलाच्या प्रभुला माणले, आम्ही या मुलाच्या प्रभुवर ईमान आणले, बादशाह ला सांगण्यात आले की ज्याची तुला भिती होती तेच घडले, लोकानी अल्लाह वर ईमान आणले आहे, बादशहा ने दरबाराच्या दरवाजावर खंदक
खोदण्याचा आदेश दिला, खंदक खोदण्यात आली त्यात आग भडकवण्यात आली, आदेश देण्यात आला
की जो या मुलाचा धर्म सोडणार नाही, त्याला या खंदक मधे ढकलुन द्यावे, लोकानी तसंच
केलं परंतु एक महिला आली, तिच्यासोबत एक बाळ होतं, ती महिला त्या अग्नीत जाण्यास
घाबरली मागे सरकली, त्यवर ते बळ बोलुन लागलं, हे ,आई! संयम ठेव तु सत्यावर आहेस''.
[صحيح] [رواه مسلم]

प्रेषित (अल्लाहचे शांती आणि आशीर्वाद त्याच्यावर असो) म्हणाले की आपल्यापूर्वीच्या लोकांमध्ये एक राजा होता, आणि त्याच्याकडे एक जादूगार होता, जादूगार म्हातारा झाला तेव्हा त्याने राजाला सांगितले: मी आता वृद्ध झालो आहे, तुम्ही माझ्याकडे एक तरुण मुलगा पाठवा, मी त्याला जादू शिकवतो. राजाने त्या जादूगाराकडे एक तरुण मुलगा पाठवला, जेणेकरून तो त्याला जादू शिकवेल, त्या तरुणाला जादूगाराकडे जाताना रस्त्यात एक राहिब भेटत असे, एकदा तो राहिब जवळ बसला आणि त्याचे बोलणे ऐकले, ते त्याला आवडले, मग तो जेव्हा जेव्हा जादूगाराकडे जायचा, तेव्हा आधी राहिब जवळ बसायचा, जादूगाराकडे उशिरा पोहोचला की जादूगार त्याला मारायचा, त्या तरुणाने ही गोष्ट राहिबला सांगितली, राहिब म्हणाला: जेव्हा तुला जादूगाराची भीती वाटेल तेव्हा सांग की मला घरच्यांनी थांबवले होते, आणि जेव्हा घरच्यांची भीती वाटेल तेव्हा सांग की मला जादूगाराने थांबवले होते, अशाच रीतीने वेळ जात होता, एके दिवशी तो एका मोठ्या प्राण्याकडे आला, ज्याने लोकांचा रस्ता अडवला होता, तेव्हा त्या तरुणाने म्हटले:आज मी जाणून घेईन की जादूगार चांगला की राहिब चांगला? त्याने एक दगड उचलला आणि म्हणाला: अल्लाह! जर राहिबचे कार्य तुला जादूगाराच्या कार्यापेक्षा अधिक

विश्वास ठेवतो, आम्ही त्या मुलाच्या रब्बावर विश्वास ठेवतो, आम्ही त्या मुलाच्या रब्बावर विश्वास ठेवतो. मग राजाकडे येऊन त्याला सांगण्यात आले: तू ज्याची भीती बाळगत होतास, ते पाहिलेस का? अल्लाहची शपथ ज्याची तुला भीती होती तेच तुझ्यावर आले आहे लोक मुलाच्या मागे चालू लागले आहेत आणि सर्वजण त्याच्या परमेश्वरावर विश्वास ठेवू लागले आहेत, मग राजाने आदेश दिला की रस्त्यांच्या प्रवेशद्वारांवर मोठमोठे, लांबट असे खंदक खोदले जावेत आणि त्यामध्ये आग पेटवली जावी, त्याने म्हटले: जो आपल्या धर्मातून परत फिरणार नाही, त्याला या आगीत फेकून द्या. त्यांनी राजाच्या आदेशाप्रमाणे तसेच केले, इतक्यात एक स्त्री आपल्या मुलाला घेऊन आली, ती थांबली, मागे हटली आणि आगीत जाणे तिला कठीण वाटले, तेव्हा तिच्या बाळाने तिला सांगितले: अगं आई! धीर धर, निश्चितच तू सत्याच्या मार्गावर आहेस.

http://sunnah.global/hadeeth/mr/show/3303